# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग कार्यालय
## **सभावृत्तांत**
(कार्यपत्रिका क्र. ३)

दिनांक : ११/०६/२०१४ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जून २०१४ ची मासिक सभा बुधवार दिनांक ११/०६/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य/ सदस्या उपस्थित होते.

१. मा.सौ.सुभद्रा ईश्वर ठोंबरे सभापती
२. मा. बाबर शारदा प्रकाश
३. मा.भारती फरांदे
४. मा.आर.एस.कुमार
५. मा.जावेद रमजान शेख
६. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
७. मा.नेटके सुमन राजेंद्र
८. मा.तरस बाळासाहेब जयवंत
९. मा. मोरेश्वर महादू भोंडवे

याशिवाय श्री. प्रशांत खांडकेकर-क्षेत्रीय अधिकारी, श्री.एस.टी.इंगळे- कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री. मोहन करमरकर– उपअभियंता पाणीपुरवठा, श्रीम. लता बाबर- उपअभियंता विद्युत, श्री.अनिल शिंदे, श्री.सुनिल वाघुंडे - उपअभियंता स्थापत्य, श्री.के.डी. दरवडे – सहा.आरोग्याधिकारी, श्री.जाधव पी.जी. लेखाधिकारी, श्री.ए.ए.कुलकर्णी– कनिष्ठ अभियंता (जलनि:सारण), इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्माननिय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

मा.सभापती यांचे परवानगीने खालीलप्रमाणे ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र. १ मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा प्रस्ताव
प्रभाग नं. १६ गुरुदेवनगर आकुर्डी गावठाणातील जुने संडास ब्लॉक पाडून नवीन दुमजली संडासब्लॉक बांधणेबाबत.

विषय क्र. २ मा.आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव
श्री.सतिश इंगळे, कार्यकारी अभियंता स्थापत्य, अ क्षेत्रीय कार्यालया यांची बदली न करणेबाबत.

विषय क्र. ३ मा. प्रतिभा ज्ञानेश्वर भालेराव यांचा प्रस्ताव
प्रभाग नं. १६ मध्ये कै.पांडूरंग काळभोर सभागृहाचे सिमाभिंतीवर काटेरी तारेचे कुंपन करणे व तेथे रखवालदार नियुक्त करणेबाबत.

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक: मा.आर.एस.कुमार अनुमोदक: मा. जावेद शेख

केंद्रीय ग्रामविकास मंत्री श्री.गोपीनाथ मुंढे यांचे नुकतेच अपघाती निधन झालेने त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात येवून आज होणारी प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक २६/६/२०१४ रोजी दुपारी १२.०० वा. पर्यंत तहकुब करण्यात यावी.

सदरची सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.

मा.सभापती : आज होणारी प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक २६/६/२०१४ रोजी दुपारी १२.०० वा. पर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

सही/-
(सौ. सुभद्रा ईश्वर ठोंबरे)
सभापती
अ प्रभाग समिती

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग कार्यालय

**सभावृत्तांत**

(कार्यपत्रिका क्र. ३)

(दिनांक ११/६/२०१४ ची तहकुब सभा)

दिनांक : ११/०६/२०१४ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जून २०१४ ची दिनांक ११/०६/२०१४ रोजी तहकुब करणेत आलेली मासिक सभा गुरुवार दिनांक २६/०६/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य/ सदस्या उपस्थित होते.

१. मा.मोरेश्वर महादू भोंडवे सभा अध्यक्ष
२. .जावेद रमजान शेख
३. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
४. मा.नेटके सुमन राजेंद्र
५. मा.प्रसाद शेट्टी

याशिवाय श्री. प्रशांत खांडकेकर-क्षेत्रीय अधिकारी, श्री.जी.आर. चिंचवडे- कार्यकारी अभियंता विद्युत, श्री.लियाकत पिरजादे- कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री.आबासाहेब ढवळे उपअभियंता (जलनि:सारण), श्री.शिवाजी चौरे- उपअभियंता नगररचना, श्री.सुनिल पवार- कनिष्ठ अभियंता स्थापत्य, श्री.जाधव पी.जी. लेखाधिकारी, श्री.डी.एस. सासवडकर मुख्य आरोग्य निरीक्षक, इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा. जावेद शेख अनुमोदक : मा. प्रतिभा भालेराव

सभा कामकाज भरविणेकामी नेमलेल्या वेळी मा. अध्यक्षा सभागृहात उपस्थित नसलेने आजच्या सभेचे अध्यक्ष म्हणून श्री.मोरेश्वर महादू भोंडवे यांची निवड अकरण्यात यावी.

सदरची सुचना सर्वानुमते मान्य करण्यात आली.

श्री.मोरेश्वर महादू भोंडवे यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले.

मा. सभा अध्यक्ष यांनी उपस्थित सन्माननिय नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

अ) दिनांक १५/०५/२०१४ रोजी घेणेत आलेल्या माहे मे चे मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यक्रम पत्रिका क्र. २ ) कायम करणेत आल्याचे मा. अध्यक्ष यांनी प्रकट केले.

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : १९ | विषय क्रमांक | : १ |
| दिनांक | : २६/०६/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. प्रतिभा भालेराव | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

संदर्भ: मा. प्रतिभा भालेराव यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १६ गुरुदेवनगर आकुर्डी गावठाण येथील ओढ्यालगत असलेले संडास ब्लॉक खराब झालेने ते काढून टाकणेस व त्याऐवजी सुदर्शनगर येथे नवीन दुमजली संडास ब्लॉक बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २० | विषय क्रमांक | : २ |
| दिनांक | : २६/०६/२०१४ | विभाग | : प्रशासन |
| सुचक | : मा. बाळासाहेब तरस | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

संदर्भ: मा. आर.एस.कुमार यांचा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य विभागात नोव्हेंबर २०१३ पासून चार कार्यकारी अभियंता यांच्या बदल्या झालेल्या असल्याने स्थापत्य विषयक बरीच कामे रखडलेली आहेत, अनेक प्रकल्पांवर निर्णय घेणे प्रलंबित आहेत, मोठी कामे करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. अखेर श्री.सतिश इंगळे, कार्यकारी अभियंता यांची अ क्षेत्रीय कार्यालयात स्थापत्य विभागात नेमणूक झालेने निविदा विषयक व इतर बरीच कामे मार्गी लागलेली आहेत. म्हणून श्री.सतिश इंगळे, यांची कार्यकारी अभियंता स्थापत्य, अ क्षेत्रीय कार्यालय या पदावरुन मनपाच्या पुढील सार्वत्रिक निवडणूकी पर्यंत बदली करण्यात येवू नये, यास मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी प्रशासन विभागास पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

| | | | |
|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : २१ | विषय क्रमांक | : ३ |
| दिनांक | : २६/०६/२०१४ | विभाग | : स्थापत्य |
| सुचक | : मा. प्रतिभा भालेराव | अनुमोदक | : मा. जावेद शेख |

संदर्भ: मा. प्रतिभा भालेराव यांचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक १६ मधील पांडुरंग काळभोर सभागृहात प्रभागातील मुले येऊन दारू पितात, बाटल्या सभागृहाच्या आवारात टाकतात तसेच सभागृहाची नासधूस करतात म्हणून सभागृहाचे सिमाभिंतीस काटेरी तारेचे कुंपन लावणेस तसेच सभागृहात २४ तास सुरक्षा कर्मचारी नियुक्त करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

यानंतर मा.सभा अध्यक्ष यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
(मोरेश्वर महादू भोंडवे)
सभा अध्यक्ष
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ प्रभाग समिती
अक्षेका /११/ कावि/ २१७ /२०१४
दिनांक ३० / ०६ /२०१४

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ क्षेत्रीय कार्यालय

प्रत- सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.